**नि.फौ.प्र. क्रं. ९५३/२०२२**
**शासन–वि–शरद कदम व इतर**
**नि.क्रं. ५०**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ यांची जबानी :–
मी याव्दारे शपथेवर कथन करते की –

माझे नांव :– विष्णु गुलाबराव काशिद
वय :– ६७ वर्षे, धंदा :– चालक,
रा. :– आकुर्डी, पुणे.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सरकारी विधीज्ञ</u>**
**<u>श्री. संजय राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

फिर्यादी ही माझी मुलगी आहे. फिर्यादीचे लग्न सन २००८ मध्ये आरोपी क्रं. १ सोबत आळंदी येथे रितीरिवाजाप्रामणे करण्यात आले होते. लग्नाचा संपुर्ण खर्च मी केला होता. लग्नानंतर माझी मुलगी आरोपींचे घरी तळेगाव येथे नांदण्याकरिता गेले होते. लग्नाचे दोन ते तीन महिन्यापर्यत आरोपी लोक यांनी माझे मुलीला चांगले वागविले. त्यांनतर आरोपी लोकांनी तिला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतअर आरोपी क्रं. १ चे आईवडिल माझे मुलीला स्वयपाक येत नाही, घरगुती काम येत नाही असे म्हणुन तिला मानसिक व शारिरीक त्रास देत होते. आरोपी क्रं. १ हा दारु पिउन माझे मुलीला मारहाण करित होता.

**२.** आरोपी लोकांनी माझे मुलीलाम माहेरुन फ्लॅट व कार घेण्याकरिता रुपये ५,००,०००/– मागणी करित होते व सदरचे पैसे माझे देण्याची ऐपत नसल्यामुळे आरोपी लोक माझे मुलीला मानसिक त्रास देत होते व आरोपी क्रं. १ हा मारहाण करित होता. तसेच माझे मुलीचे दिर व नणंद घरगुती कारणांवरुन व माहेरुन पैसे आणण्यावरुन टोचुन बोलुन त्रास देत होते.

**३.** काही दिवसांनी आरोपी लोक माझे मुलीसोबत पिंरगुट येथे सिलांतर झाले तिथेसुध्दा आरोपी लोक माझे मुलीला त्रास देत होते व शेजारचे लोकांना माझे मुलीबद्दल खोटे बोलत होते. पिरंगुट माझे मुलीला एक मुलगी झाली आरोपी लोक त्यावर नाराज होवुन आम्हाला मुलगा पाहिजे होता असे म्हणुन माझे मुलीला त्रास देत होते.

४.   काही दिवसानंतर माझी मुलगी आरोपी क्रं. १ सोबत ओमन येथे राहण्याकरिता गेली. तेथेसुध्दा आरोपी क्रं. १ हा दारु पिवुन माझे मुलीला मारहाण करित होते. सदरची बाब माझी मुलगी आम्हाला फोनव्दारे सांगत होती. आरोपी क्रं. १ माझे मुलीला ओमान येथे रहातांना रुममध्ये कोंडुन ठेवत होता व सदरचे मारहाणी व त्रासाबद्दल माझे मुलीने ओमान येथेसुध्दा तक्रार दिली होती. सन २०२१ मध्ये आरोपी क्रं. १ माझे मुलीला व त्यांचे मुलांना घेवुन परत भारतात आहे. आल्यानंतर आरोपी क्रं. १ हा आमचे घरी चार दिवस राहिला व चवथ्या दिवशी कोणालाही काही न सांगता घरातुन पळुन गेला. आरोपी क्रं. १ भेटला नसल्यामुळे आम्ही त्यांचे मिसींगची तक्रार दिली होती. आरोपी लोकांनी दिलेल्या त्रासामुळे माझे मुलीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. पोलीसांनी माझेकडे चौकशी केली होती व माझे बयाण नोंदविले होते.

५.   मी आरोपी लोकांना ओळखतो. आरोपी क्रं. १ हा आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. पी. चव्हाण यांचेतर्फे शपथेवर सुरु**

६.   पोलीसांनी माझे बयाण सन २०२१ मध्ये नोंदवुन घेतले होते, मला नेमकी तारीख आठवत नाही. माझे मुलीचे नणंदेचे नाव मला आज रोजी आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे मुलीचे नणंदेचे लग्न माझे मुलीचे लग्नापुर्वी झाले होते. माझे मुलीचे नणंदेचे सासर नेमके कुठे आहे हे मला माहित नाही परंतु ती मंचर येथे राहते हे मला माहित आहे. आम्ही आमचे मुलीचे नणंदेचे लग्नात गेली नव्हतो. तिचे लग्नाला माझी मुलगी गेली होती. माझे मुलीचे नणंदेच्या लग्नाची पत्रिका आम्हाला आली होती किंवा नाही हे मला आज रोजी आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे मुलीचे सासुसासरे हे सन २०१२ पासुन मंचर येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की माझे घरापासुन मंचर ६० ते ७० किलोमीटर अंतरावर आहे.

७.   हे म्हणणे खरे आहे की सन २०१२ पासुन माझी मुलगी आरोपी क्रं. १ सोबत व त्यांचे मुलांसोबत राहत होमती. हे म्हणणे खरे आहे की माझे मुलीला पहिली मुलगी व दोन वर्षानंतर एक मुलगा नावे जय झाला होता. लग्नापुर्वी माझे मुलगी शाळेमध्ये असतांना मैत्रीणी होत्या. लग्नानंतर माझे मुलगी

जेथेजेथे राहत होती तेथे तेथे तिचे शेजारचे लोकांसोबत चांगले संबंध होते.

८. माझे मुलीचे लग्न नेमके कोणते तारखेला झाले होते हे मला आज रोजी आठवत नाही. लग्नामध्ये जो खर्च झाला होता त्यांच्या पावत्या ती पोलीसांना तपासदरम्यान दिल्या नव्हत्या. आरोपी लोक माझे मुलील नेमके कोणकोणते तारखेला त्रास दिले होते हे मला माहिती नाही. तसेच आरोपी लोक माझे मुलीला रुपये ५,००,०००/— मागणी नेमकी कोणत्या तारखेला केली होती हे मी आज रोजी सांगु शकत नाही. माझी मुलगी पिंरगुट येथे सन २०१३ ते २०१५ पर्यत राहत होती. आरोपी लोक माझे मुलीला त्रास देत होते त्यामुळे मी तळेगाव येथील पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरिता गेलो होतो परंतु त्यांनी माझी तक्रार घेतली नाही. सदरची तक्रार देण्याकरिता मी नेमकी कोणत्या तारखेला गेलो होतो हे मला आठवत नाही. आरोपी क्रं. १ माझे मुलीला दारु पिउन मारहाण करित होता याबद्दल मी स्वत: तक्रार दिली नाही. आरोपी क्रं. १ ने माझे मुलीला मारहाण केल्यांनतर मी स्वत: माझे मुलीला ४ ते ५ वेळो दवाखान्यात उपचारकरिता नेले होते.

९. आरोपी क्रं. १ आमचे घरातुन जेव्हा निघुन गेला होता आम्ही मिंसीगची तक्रार दिल्यानंतर आम्ही मचंरला सुध्दा गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही मंचर येथे गेल्यावर आरोपी लोकांना खुप शिवीगाळ केली होती त्याविरोधात आरोपी लोकांनी आमचे विरोधात तक्रार दिली होती व सदरचे तक्रार निमीत्ताने पोलीसांनी आम्हाला पोलीस स्टेशनला बोलाविले होते. आरोपी क्रं. ३ मयत झाल्यानंतर मी व माझी मुलगी तिचे मयतीला व इतर कार्यक्रमाकरिता गेलो नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की माहिती नसल्यामुळे आम्ही गेलो नाही. माझे मुलीचे दिराचे नाव गणेश अशोक कदम आहे व माझे मुलीला एकच दिर आहे. माझी मुलगी शिक्षणामध्ये उत्कुष्ट होती व तिचे शिक्षण बीएसी झाले आहे. माझी मुलगी लग्नापुर्वी व लग्नांनतर नोकरीवर होती.

१०. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्रं. १ चे माझे मुलीसोबत पटत नाही. आरोपी क्रं. १ हा माझे मुलील नांदवत नाही करिता माझे मुलीने सदरची तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासमधील घटना कधीच घडल्या नाही व त्याबद्दल मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे मुलीला आरोपी लोकांना कधीच शारिरीक व मानसिक त्रास दिलेला

नाही व कधीच पैशाची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझी मुलीने आरोपी लोकांना त्रास देण्याचे दृष्टीने खोटी तक्रार केली आहे व आज रोजी तिचे सांगणेवरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.11.01 16:46:23 +0530

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.11.01 16:46:26 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

दि.०१.११.२०२५

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक | :०१/११/२०२५ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | :०१/११/२०२५ |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : ०१/११/२०२५ |

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)